Vol 5 Issue 10 April 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldgrt.lbp.world**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016

Golden Research Thoughts

# लघुउद्योगाचा अर्थव्यवस्थेवरील होणारा परिणाम

पिसाळ प्रभाकर
एम्.कॉम. , मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे.

**प्रस्तावना : –**

**उद्योग :** 'उद्योग' ह्या संज्ञेत प्रचलित अर्थाने अनेक आर्थिक व्यवहारांचा समावेश होतो. परंतु औद्योगिक अर्थशास्त्रात उद्योग ह्या शब्दाला मर्यादित अर्थ आहे. ह्या संदर्भात उद्योग म्हणजे ज्या उत्पादनसंस्थात नैसर्गिक साधनसामग्रीवर प्रक्रिया करून उपभोग्य किंवा पुढील उत्पादन प्रक्रियेस उपयुक्त, असा एकच प्रकारचा माल निर्माण केला जातो, अशा उत्पादनसंस्थांचा समूह. या अर्थाने उद्योग ह्या संज्ञेत उपभोग्य व उत्पादक वस्तूंचे उद्योग, कुटीरउद्योग, लघुउद्योग व हस्तव्यवसाय ह्यांचा समावेश होतो. त्याचबरोबर ह्या व्यापक वर्गीकरणातील प्रत्येक प्रकारच्या उद्योगातसुद्धा अनेक उद्योग आहेत. उत्पादनसंस्था व उद्योग ह्यांतील फरक स्पष्ट करणे जरूर आहे; उद्योग म्हणजे एकाच प्रकारच्या वस्तू निर्माण करणाऱ्या अनेक उत्पादनसंस्थांचा समूह. उदा., कापड उद्योग आणि संदर्भात उत्पादनसंस्था म्हणजे कापड कारखाना.

**उद्योगांचे वर्गीकरण :** उद्योग ह्या संज्ञेची राष्ट्रातील आर्थिक व्यवहारांच्या वर्गीकरणसुद्धा व्याख्या करता येईल. राष्ट्रातील आर्थिक व्यवहारांचे वर्गीकरण तीन विभागांत करतात, ते असे : प्राथमिक, द्वितीयक व तृतीयक विभाग. हे वर्गीकरण प्रामुख्याने या तीन विभागांतील उत्पादनाचे स्वरूप व त्यातील मानवी श्रमाचा भाग, ह्या दोन गोष्टी पुढे ठेवून केले आहे. प्राथमिक विभागातील कृषि–उद्योग, खनिकर्म, जंगल उद्योग, मच्छीमारी ह्यांचा जो तयार माल उपलब्ध होतो, त्यात निसर्गदत्त देणगीचा वाटा मोठा असून मालावरील प्रक्रियेत मालाचा श्रमाचा भाग मर्यादित असतो. द्वितीयक विभागात नैसर्गिक साधनसामग्रीवर प्रक्रिया करून तिचे उपभोग्य वा पुढील टप्प्यांच्या वस्तूंच्या उत्पादनास योग्य, असे रूपांतर केले जाते. ह्या विभागात इतर आर्थिक व्यवहारांबरोबर अवजड उद्योगधंदे, भांडवली उद्योगधंदे, उपभोग्य वस्तूंचे उद्योगधंदे, कुटीरउद्योग, हस्तव्यवसाय, लघुउद्योग यांचाही समावेश होतो. ह्या विभागातील मालाच्या उत्पादनात मानवी प्रयत्नाचा वाटा मोठा असतो. तृतीयक विभाग म्हणजे सेवा विभाग व वाहतूक, दळणवळण इत्यादी. ह्यात डॉक्टर, वकिलावासून घरगड्यापर्यंच्या विविध वैशिष्ट्य असे की, ह्यात दृश्य वस्तूंचे उत्पादन होत नाही.



उद्योगांचे इतर दृष्टिकोनातूनही वर्गीकरण करता येते. उद्योगात निर्माण होणाऱ्या मालावरून उत्पादक वस्तूंचे व उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाला साहाय्यभूत असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन होते. हे उत्पादन प्राथमिक सामग्रीचे असेल किंवा यंत्रसामग्रीचे असेल. उपभोग्य वस्तूंच्या उद्योगांत ग्राहकांस लागणारा माल निर्माण केला जातो.

**राष्ट्रीय लघउद्योग निगम**

**राष्ट्रीय लघुउद्योग निगम :** देशातील लघुउद्योगांच्या विकासासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात जी पावले टाकण्यात आली, त्यांत राष्ट्रीय लघुउद्योग निगमाची प्रस्तावना हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. केंद्र शासनाने 1953 मध्ये लहान उद्योगांच्या समस्यांचा अभ्यास करून त्यांच्या विकासासाठी आवश्यक सूचना करण्याकरिता फोर्ड प्रतिष्ठानाच्या तज्ज्ञांना पाचरण केले. या तज्ज्ञांच्या विविध शिफारशींत

लघुउद्योग कारखानांच्या 1) सरकारकडून कंत्राटे मिळविण्यात साहाय्य, 2) पणन आणि संशोधन सुविधा 3) स्वस्त हप्तेबंदीने यंत्रहत्यारे मिळण्याची व्यवस्था, अशा प्रकारच्या सेवा पुरविणारी यंत्रणा असावी, अशी महत्त्वाची शिफारस होती.

या शिफारशीला मूर्त स्वरूप देण्याच्या दृष्टिने भारत सरकारने फेब्रुवारी 1955 मध्ये राष्ट्रीय लघुउद्योग निगम प्रस्तापिला. या निगमाचे प्रारंभी अधिकृत भांडवल 10 लक्ष रूपये व विक्री केलेले 2 लक्ष रूपये असून ते केद्र सरकारने पुरविले होते. निगमाचे काम जसजसे वाढत गेले, तसतसे भांडवलही वाढवावे लागले आणि 1984–85 च्या अखेरीस अधिकृत भांडवल 20 कोटी रूप्ये व विक्री केलेले 16.8 कोटी रूपये इतके होते.



### *निगमाची प्रमुख कार्यक्षेत्रे*

***निगमाची चार प्रमुख कार्यक्षेत्रे :*** 1) पणन सेवा, 2) प्रशिक्षण आणि आदिरूपांच्या विकास, 3) भाडे–खरेदी आणि 4) तंत्रज्ञानविषयक सेवा. या क्षेत्रांमध्ये केली जाणारी प्रधान कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.:

***1) पणन सेवा :*** या सेवेत पणनाच्या विविध बाबींसंबंधी साहाय्य दिले जाते. त्यांमध्ये प्रामुख्याने देशांतर्गत पणन, सरकारला मान विकणे, निर्यात, कच्च्या मालाची आयात व पुरवठा, पणन सुलभ रहावे यासाठी एकत्र संस्था स्थापणे, जत्रा आणि प्रदर्शने भरविणे यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे मालाची विक्रीही केली जाते.

***2) प्रशिक्षण आणि आदिरूपांच्या विकास :*** उद्योगधंद्यांच्या विकासाच्या तंत्रज्ञानाचे दृष्टिने तंत्रज्ञानाची यथायोग्य माहिती असणे व नव्या प्रकारची यंत्रे बनविणे आवश्यक आहे. याकरिता मूलभूत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देणे, त्यांच्या कौशल्याचा दर्जा वाढविणे, उच्च गुणवत्तेची यंत्रे तयार करण्यासाठी प्रशिक्षण आणि नव्या यंत्रांच्या आदिरूपांची चाचणी घेणे व त्यांचा विकास करणे, ही कार्ये निगम करतो.

***3) भाडे खरेदी :*** कारखान्यांच्या आधुनिकीकरणासाठी आणि विस्तारासाठी निगम त्यांना बीजभांडवल पुरविणे, आयात केलेली आणि देशी बनावटीची यंत्रे भाडे–खरेदी पद्धतीने पुरविणे आणि अंगभूत यंत्रांच्या विकासालउा मदत करणे, अशा प्रकारे साहाय्य करतो. मागासलेल्या क्षेत्रांतील उद्योजकांसाठी तसेच अनुसूचित जाती आणि जमाती, शरीराने अध, निवृत्त सैनिक आणि तंत्रज्ञवर्गीय यांना सवलतीच्या दराने निगमाकडून यंत्रे दिली जातात.

***4) तंत्रज्ञान :*** प्रकल्पासाठी समंत्रणा, अन्वेषण आणि शक्यता अहवाल, तंत्रज्ञान हस्तांतरण प्रक्रिया आणि साधनसामग्रीचा विकास व यथायोग्य तंत्रज्ञान या बाबतींत निगम कारखान्यांना विविध सेवा पुरविणे.

### *उद्योजक*

एखादया व्यवसायात उद्यम साध्य करण्याला उद्योजकता असे म्हणता येते. उद्योजकाला खालील गुणांवर साध्य करता येऊ शकते.

- सचोटी
- वेळेचे काटेकोर नियोजन
- हिशेबी–व्यवसायिक वृत्ती
- कल्पकता
- कष्ट
- ग्राहकभिमुखता – ग्राहकांचे समाधान
- गुणवत्तेचा ध्यास
- आशावादी विचार
- संकुचितपणाचा त्याग
- नवनवीन संकल्पना आणि उद्योगवाढी प्रयत्नशील असणे
- जागतिक भवन
- उद्योग प्रक्रियेचा पूर्ण तपशील माहिती करणे
- योग्य तेथे लाच अथवा भेटवस्तू देणे
- लाचखोर लोकांचा राग न येऊ देता त्यांच्याशी गोड गोड बोलणे
- सरकारी नियम माहिती करून त्यानुसारच व्यवसाय करणे
- दबाव गट बांधता येणे
- दबाव तंत्र वापरता येणे

- ✦ पैश्यांच्या आवक जावकेवर बारीक लक्ष ठेवता येणे
- ✦ नफा येवो, अथवा तोटा, न डगमगता परिस्थिती हाताळणे

### महामंडळाच्या योजनेतील व्यवसाय

शासनाच्या अंतर्गत येणाऱ्या महामंडळाच्या योजनांच्या साहाय्याने विविध व्यवसाय सुरू करता येतात. महामंडळामार्फत वेगवेगळ्या प्रकारचे व्यवसाय उपलब्ध आहेत. अत्यल्प भांडवलाच्या आणि शासनाच्या आर्थिक सहकार्याने आपण हे व्यवसाय चांगल्या प्रकारे करू शकतो. महामंडळाच्या सहकार्याने आपण आपला आर्थिक विकास करू शकतो. इतकेच नव्हे तर इतरांना देखील रोजगार मिळवून देऊ शकतो.

### पारंपारिक व्यवसाय

सुतारकाम, लोहारकाम, कुंभारकाम, टेलरिंग मशिन शॉप, दागिने बनविणे, सुती कापड तयार करणे, हस्तकला, लाकूड कोरीव काम, धोबी काम, केश कर्तनालय, बांगडीचे दुकान, मासे खरेदी विक्री, तयार कपडे हातमागाचे कापड तयार करणे, फळे–भाजीपाला विक्री, ब्लॅकेट तयार करणे.

### वाहतूक क्षेत्रांशी संबंधित व्यवसाय

सायकल, जीप, टुरिस्ट टॅक्सी, प्राण्यांचा वापर केलेली गाडी, मिनी ट्रक, ऑटो रिक्षा, मारूती व्हॅन, दळणवळण व्यापार संस्था, मिनी बस.

### तांत्रिक स्वरूपाचे व्यवसाय

वाहन सर्व्हिसिंग केंद्र, टायर दुरूस्तीचे दुकान, इलेक्ट्रानिक वस्तूंचे सेंटर, डीश अँटीना, वातानुकुलित यंत्र, टी.व्ही./रेडीओ दुरूस्ती, मोटार सायकल दुरूस्ती सेंटर, विद्युत मोटार वायडींग व पंपसेट विक्री, बॅटरी चार्जिंग व दुरूस्ती, पी.यु.सी. सेंटर (फिरते), प्रदूषण मापक केंद्र, ग्लास व फोटो फ्रेम, टायपिंग केंद्र, वास्तू विशारद व्यवसाय.

### लघु (छोटे) व्यवसाय

मसाला उद्योग, घरगुती उद्योग, सिमेंट जाळी उत्पादन, छापखाना (प्रिंटींग प्रेस), मिठाईचे दुकान, झेरॉक्स मशिन, धुपचंदन अगरबत्ती, ब्युटीपार्लर, स्टील भांडी, ज्यूस सेंटर, किराणा मालाचे दुकान, कपड्यांचा व्यापार, व्हिडिओ लायब्ररी (सी.डी., ऑडिओ, व्हिडिओ रेकॉर्डिंग,) पर्यअन व्यवसायाशी निगडीत, असे अनेक व्यवसाय आहेत.

### कृषि संलग्न व्यवसाय

फुलझाडांची लागवड, फळबाग, ट्रॅक्टर, ट्रॉली, मळणी यंत्र, बी–बियाणे आणि औषध खते विक्री, दुग्ध व्यवसाय, आळंबी उत्पादन, रेशीम उद्योग, कुक्कट पालन, शेळी पालन, मत्स्य व्यवसाय.

शासकीय महामंडळे या व्यवसायांना सर्वतोपरी मदत करतात. संबंधित लोकांना योजनेविषयी माहिती देतात.

पूर्वी गावात बारा बलुतेदारी व्यवस्था होती. आता जमाना बदलला. ''बारा'' ची जागा बाराशे, बारा हजार व्यवसायांनी घेतली. गरजांमध्ये वैविध्य आले. नवीन गोष्टींची आवश्यकता वाढली. नावीन्याचा शोध घेण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढला. संगणकाच्या एका क्लिकवर माहितीचा खजिना उपलब्ध असल्याने त्याचा वापर करून आपल्याला व्यवसायातील त्रुटी भरून काढणे, नवीन माहिती मिळवून काही तंत्र पद्वती अमलात आणणे, वस्तूचा दर्जा उंचावणे, कमी किंमतीत जादा माल उत्पादन करणे अशा गोष्टी सर्वसामान्य उद्योजक करायला लागला. मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग वाढला आणि त्याबरोबर व्यवसायही. अशा या व्यवसायांसाठी काही उत्तम योजना आखल्या गेल्या.

लघु, लहान व मध्यम व्यवसाय (Micro, small and medium enterprises, MSME) अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. वर्षानुवर्षे चालत आलेले पारंपारिक व्यवसाय आणि त्याबरोबर नवीन प्रगती तंत्रज्ञानावर आधारित व्यवसाय या सर्वांचा समावेश MSME मध्ये होतो. उदाहरणार्थ – जुने व्यवसाय चांभार, कुंभार, विणकर, सराफ इ. आणि नवे व्यवसाय आयटी, टेलिकॉम, KPO, BPO इ. असे व्यावसायिक खूप मोठ्या संख्येने असून त्यांची आर्थिक गरजही मोठी आहे. आपल्या देशाच्या प्रगतीमध्ये यांचा वाटा मोठा आहे.

### लघु व मध्यम उद्योगांची समस्या संपणार

लघु व मध्यम उद्योगांना (एमएसई) लवकरच कारभार करणे सुलभ होणार आहे. श्रम कायद्याची निगडित अनेक फॉर्म भरणे तसेच अनेक स्तरांवर होणारी तपाणीची सध्याची व्यवस्था बंद करण्याचा विचार आहे. एसएमईने एकच फॉर्म भरून कारभाराला सुरूवात करावी तसेच कारखान्याच्या तपासणीसाठी एकच तंत्र असावे, असा सरकारचा प्रयत्न आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. सध्या एसएमई उद्योजकांना अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. हे टाळण्यावर आम्ही लक्ष केंद्रीत करत आहोत. ही व्यवस्था बदलण्यासाठी वित्त तसेच श्रम मंत्रालयाशी चर्चा सुरू आहे. या अधिकाऱ्यांच्या मते, एमएसई उद्योजकांना सध्या श्रम कायदयाशी संबंधित 13 विविध प्रकारचे फॉर्म भरावे लागतात. याशिवाय त्यांच्या कारखान्यात आठ निरीक्षक तपासणीसाठी जातात.

या 13 फॉर्मऐवजी एसएमई उद्योजकांना एकच फॉर्म भरावा लागावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शिवाय तपासणीची पद्धतही सोपी बनवण्याचा आमचा भर आहे. यामुळे लघु, मध्यम उद्योजकांचा त्रास कमी होणार आहे.अधिकाऱ्यज्ञांच्या मते, सध्याच्या श्रम कायद्यानुसार 10 कर्मचारी असणाऱ्या एसएमईला रजिस्टर ठेवावे लागते. ही संख्या 50 कर्मचाऱ्यांपर्यंत वाढवण्यात यावी. यामुळे बऱ्याच कागदपत्रांच्या जमवाजमावीतून उद्योजकांची सुटका होईल.

फेडरेशन ऑफ इंडियन मायक्रो अँड स्मॉल अँड मीडियमचे (फिस्मे) सरचिटणीस अनिल भारद्वाज यांच्या मते, लघु, मध्यम

उद्योजकांपुढे वाजवी किमतीची जमीन उपलब्ध नसणे ही सर्वात मोठी समस्या आहे.

अनेक लघु, मध्यम उद्योग अनधिकृत जमिनीवर उभे आहेत. अशा उद्योजकांना बँका कर्ज देण्यास कचरतात. अशा परिस्थितीत या उद्योगांना औद्योगिक वसाहतीत सवलतीच्या दरात जमिनी मिळायला हव्यात.

आम्ही ईजी डुइंग बिझनेस या शीर्षकाचे एक पत्र एमएसएमई मंत्रालयाला पाठवले आहे. यात लघु , मध्यम उद्योगांच्या सुलभ कारभारविषयी सर्व पैलूंवर सविस्तर नमूद करण्यात आले आहे.

### *संदर्भसूची*

www.navshakti.com
www.marathi.webdunia.com
www.spardhamantra.com

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.www.oldgrt.lbp.world